# प्रकरण - तिसरे

# दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे दुध बंद आंदोलन (२००७)

## प्रकरण - तिसरे

# "दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे दुध बंद आंदोलन ( २००७ )"

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश असल्याचे सर्वश्रूत आहे. उद्योग, माहिती-तंत्रज्ञान व अन्य क्षेत्रात प्रचंड प्रगती होवूनही देशातील ६५% लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. पूर्वीपासून शेतीपूरक पशुपालनाचेही आपणास तितकेच महत्त्व आहे. खरेतर प्राचीन अशा पाषाणयुगापासून मानवाने प्राणी पाळण्यास सुरूवात केली. सप्तसिंधूच्या प्रदेशात राहणारे आर्य मोठ्या प्रमाणात पाळीव प्राणी जोपासत होते. किंबहुना पाळीव प्राणी हे त्यांच्या जीवन शैलीचे अविभाज्य भाग असल्याचे इतिहास सांगतो. इतका पुरातन वारसा असणाऱ्या या क्षेत्राचा आधुनिक काळातील प्रगतीचा आलेख पाहणे उद्बोधक ठरते. जगामध्ये सर्वात जास्त ४८.५० कोटी पशु भारतात असून त्यापैकी गायी-म्हैशींची संख्या २८.३१ कोटी इतकी आहे. जगातील १५% गायी आणि ५५% म्हैशी भारतात आहेत. देशातील १८.५२ कोटी गायी पैकी ६.४५ कोटी गायी आणि ९.७८ कोटी म्हैशी पैकी ५.१० कोटी म्हैशी दुध देणाऱ्या आहेत.[१] या संदर्भात भारताने प्रचंड प्रगती केली आहे. दुग्ध उत्पादनात भारत प्रथम क्रमांकाचा देश आहे. तर सन २००५-०६ मध्ये महाराष्ट्राचे वार्षिक दुग्धोत्पादन ६७.७४ लक्ष टन इतके होते. या संदर्भात उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, आंध्रप्रदेश आणि गुजरात नंतर महाराष्ट्राचा क्रमांक येतो. महाराष्ट्राची प्रतिमाणसी दुध उपलब्धता केवळ १७८ ग्रॅम प्रतिदिन इतकी आहे.[२]


महाराष्ट्रात एकूण ३०,९१३ दुध संस्था आहेत. त्यापैकी १३,१३५ दुध संस्था तोट्यात आहेत. महाराष्ट्रात दररोज १ कोटी लिटर दुधाचे उत्पादन होते. तर महाराष्ट्रात ९५ दुध उत्पादक संघ आहेत. त्यापैकी ४५ दुध संघ पुर्णपणे तोट्यात आहेत.

२००६-०७ ची आकडेवारी पाहता वर्षाच्या कालावधीत ११६४ दुध संस्था तोट्यात होत्या.[३] महाराष्ट्रातील दुग्धोत्पादनात दक्षिण महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. दक्षिण महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर व सांगली हे दोन जिल्हे येतात. महाराष्ट्रासह मुंबईस होणाऱ्या दुध पुरवठ्यात दक्षिण महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. आजच्या सद्य: परिस्थितीत एक लिटर पाण्याची बाटली पंधरा रूपयास विकत मिळते. परंतू एक लिटर दुधाची किंमत ७ ते ८ रूपये शेतकऱ्यांना मिळतो अशी मोठ्या प्रमाणात तफावत पहावयास मिळते. दुध उत्पादकांच्या दुधावर दुध सम्राट मोठे झालेले दिसून येतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मनात दुधाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे असंतोष निर्माण झाला. दुध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्यातील असणारा हा असंतोष राजू शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून संघटीत केला व शेतकरी संघटनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आंदोलने केली. त्या आंदोलनाचा प्रस्तुत प्रकरणात अभ्यास करण्यात येणार आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील दुध क्षेत्राचा आढावा :**

दक्षिण महाराष्ट्रातील प्रमूख दुग्धोत्पादक जिल्हा म्हणजे कोल्हापूर होय. या जिल्ह्यातील २००३ च्या पशुगणनेनुसार १२.७५ लाख इतके पशुधन होते. ते पुढील प्रमाणे आलेखाच्या सहाय्याने दर्शविण्यात आले आहे.

**आलेख क्र. ३.१ : कोल्हापूर जिल्ह्यातील २००३ च्या पशुगणनेनुसार पशुधन**




**सूची -**

**१ ) म्हैस / रेडे = ५२%**

**२ ) गाय / बैल = २१%**

**३ ) मेंढ्या = १३%**

**४ ) शेळ्या = १४%**

**कोल्हापूर जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन २००७.**[४]

वरील आलेखावरून असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्ह्यात २००३ च्या पशुगणनेनुसार ५२% म्हैशी व रेड्यांची संख्या सर्वाधिक आहे. तर सर्वात कमी संख्या १४% शेळ्यांची आहे. तसेच २००६-०७ मध्ये दुभत्या गायींची संख्या ७६ हजार इतकी होती. व दुभत्या म्हैशींची संख्या ३२५ हजार इतकी होती.[५] म्हणजेच २००३ मध्ये असणाऱ्या म्हैशींच्या संख्येत २००६-०७ साली वाढ झाल्याचे दिसून येते. तर कोल्हापूर जिल्ह्यातील दुध संकलन करण्याचे काम चार सहकारी दुध उत्पादक संघ करीत आहेत ते पुढीलप्रमाणे.

१) कोल्हापूर जिल्हा सहकारी दुग्ध उत्पादक संघ (गोकुळ), कोल्हापूर.


२) वारणा सहकारी दुध उत्पादक संघ, वारणानगर, ता. पन्हाळा.

३) मयूर सहकारी दुग्ध उत्पादक संघ, मंगरायाचीवाडी, ता. हातकणंगले.

४) महालक्ष्मी सहकारी दुध उत्पादक संघ, हमिदवाडा, कागल.

या सहकारी दूध संघांनी दुधापासून विविध पदार्थांची निर्मिती मोठ्या प्रमाणात सुरू केली असून त्या क्षेत्रांमध्ये त्यांनी लौकीक मिळविला आहे. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील दुग्ध विकास सहकारी संस्थांची संख्या २००६-०७ मध्ये ३९०७ इतकी होती. तर दुध उत्पादक सभासदांची संख्या ३,५४,१४७ इतकी होती.[६] अशा प्रकारे कोल्हापूर जिल्ह्यात दुध संस्था व दुध संघ कार्यरत आहेत. त्यांनी २००७ मध्ये केलेले दुध संकलन पुढीलप्रमाणे.

आलेख क्र.३.२ : कोल्हापूर जिल्ह्यातील सन २००७ मधील वार्षिक दुध संकलन सरासरी



## सूची


| दुध संघाचे नांव | | दुध संकलन |
|---|---|---|
| १) कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, (गोकुळ), कोल्हापूर | : | ५९९५५११ लिटर |
| २) वारणा सहकारी दुध उत्पादक संघ, वारणानगर, ता. पन्हाळा | : | ४६३३०७२ लिटर |
| ३) मयूर सहकारी दुध उत्पादक संघ, मंगरायाची वाडी, ता. हातकणंगले | : | ४७८८५५२ लिटर |
| ४) महालक्ष्मी सहकारी दुध उत्पादक संघ, हमिदवाडा, ता. कागल | : | ३४०९३७ लिटर |

वरील आलेखावरून असे दिसून येते की, कोल्हापूर जिल्ह्यातील २००७ मध्ये सर्वाधिक दुध संकलन कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, कोल्हापूर या दुध संघाचे आहे. तर सर्वात कमी दुध संकलन महालक्ष्मी सहकारी दुध उत्पादक संघ, हमीदवाडा, कागल या दुध संघाचे आहे.

**सांगली जिल्ह्यातील दुध क्षेत्राचा आढावा :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक जिल्हा म्हणून सांगली जिल्ह्यास ओळखले जाते. सांगली जिल्ह्यात सन २००३ च्या पशुगणनेनुसार १४.०७ लाख इतके पशुधन होते. ते पुढीलप्रमाणे आहे.

## आलेख क्र. ३.३ : सांगली जिल्ह्यातील २००३ च्या पशुगणनेनुसार पशुधन




**सूची -**

१ ) म्हैस / रेडे = २९%

२ ) गाय / बैल = २५%

३ ) मेंढ्या = २६%

४ ) शेळ्या = १४%

५ ) इतर पशुधन = ६%

सांगली जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन २००७.[८]

वरील आलेखावरून असे दिसून येते की, सांगली जिल्ह्यातील २००३ च्या पशुगणनेनुसार एकुण पशुधनापैकी सर्वाधिक पशुधन म्हैस व रेडे यांचे तर सर्वात कमी पशुधन शेळ्यांचे आहे. तर सांगली जिल्ह्यामध्ये २००६-०७ साली एकूण गाईंची संख्या ६६५४१ इतकी होती. व म्हैशींची संख्या १,४९,६८८ इतकी होती.[९] म्हणजेच २००३ मध्ये असणाऱ्या म्हैशींच्या संख्येत २००६-०७ साली वाढ झाल्याचे दिसून येते. या जिल्ह्यातील दुध संकलन करण्याचे काम सहा सहकारी दुध उत्पादक संघ आहेत ते पुढील प्रमाणे आहेत.

१) श्री. वसंतदादा जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, सांगली.

२) मोहनराव शिंदे सहकारी दुध उत्पादक संघ, मिरज.

३) राजारामबापू पाटील सहकारी दुध उत्पादक संघ, इस्लामपूर.

४) सोनहिरा दुध उत्पादक संघ व प्रक्रिया संघ, कडेगांव.


५) शेतकरी सहकारी दुध उत्पादक संघ, कवठे महांकाळ.

६) फत्तेसिंगराव नाईक अप्पा सहकारी दुध संघ, शिराळा.

सांगली जिल्ह्यात २००६-०७ साली ८०६ दुध विकास सहकारी संस्थांच्या सहाय्याने प्रतिदिन ४.०५ लाख लिटर याप्रमाणे १४.७८ कोटी लिटर दुध संकलित करण्यात आले होते.[१०] या दुध संस्थांची सभासद संस्था ४११०० इतकी होती.[११]

सांगली जिल्ह्यातील दुध संघांनी २००६-०७ मध्ये केलेले दुध संकलन पुढीलप्रमाणे.

आलेख क्र. ३.४ : सांगली जिल्ह्यातील सहकारी दुध उत्पादक संघाची सन २००६-०७ मधील वार्षिक दुध संकलन सरासरी




सांगली जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालय[१२]

## सूची

| दुध संघाचे नांव | | दुध संकलन |
|---|---|---|
| १) श्री. वसंतदादा जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, सांगली | : | २०३७ लिटर |
| २) मोहनराव शिंदे सहकारी दुध उत्पादक संघ, मिरज | : | १०४४३ लिटर |
| ३) राजारामबापू पाटील सहकारी दुध उत्पादक संघ, इस्लामपूर | : | १५१२०० लिटर |
| ४) सोनहिरा दुध उत्पादक संघ व प्रक्रिया संघ, कडेगांव | : | १०६२९ लिटर |
| ५) फत्तेसिंगराव नाईक अप्पा सहकारी दुध संघ, शिराळा | | १७००६ लिटर |

वरील आलेखावरून असे दिसून येते की, सांगली जिल्ह्यातील सहकारी दुध उत्पादक संघानी २००६-०७ मध्ये केलेल्या दुध संकलनापैकी सर्वाधिक दुध संकलन राजारामबापू पाटील सहकारी दुध उत्पादक संघ, इस्लामपूर या दुध संघाने केले. तर सर्वात कमी दुध संकलन श्री. वसंतदादा जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, सांगली या दुध संघाने केले.

**दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या :**

महाराष्ट्रात शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाकडे पाहिले जाते. दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण जीवनाचा कणा बनला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे शेतकऱ्यांनी या व्यवसायास जोडधंदा म्हणून दुय्यम स्थान दिले आहे. कोणत्याही व्यवसायात यशस्वी होण्यासाठी पुर्ण वेळ लक्ष देणे आवश्यक असते. या मुलभूत तत्वाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. दुध धंद्यासाठी दिवसातील काही वेळ काढणे एवढा मर्यादित अर्थ यात नसून एक व्यवसाय म्हणून त्यातील सर्वांगीण बाबींचा विचार करणे अपेक्षीत आहे. गोठा कसा असावा? स्वच्छतेची काळजी कशी घ्यावी? ओला चारा व कडबा किती द्यावा? या बाबींचे शेतकऱ्यास मुलभूत ज्ञान असले तरी, त्याची सखोल शास्त्रीय माहिती घेतली पाहिजे. दुधासाठी वापरण्यात येणाऱ्या पशुप्रजाती, त्यामागील

संकरीकरणाची टक्केवारी, प्रत्येक जनावरांची प्रजनन क्षमता, विविध आजार, संतुलित आहार या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. इतरांचे अनुकरण करून केवळ चारा, गोठा, जनावरांची निगा असा वरवरचा विचार न करता, व्यावसायिक पद्धतीने आपला दृष्टीकोन बदलने गरजेचे आहे. आपण किती भांडवल गुंतवत आहोत. ते रोखीच्या स्वरूपात आहे का? कर्जाऊ रक्कम असल्यास व्याजासह परतफेडीचा हप्ता, दैनंदीन खर्च, आपत्कालीन खर्च, निव्वळ नफा किती? या समस्या निर्माण झाल्या आहेत. तसेच दुध धंद्याचे मुळ भांडवल असणारी दुधाळ जनावरे आज मिळण्याचे प्रमाण कमी होत चालले आहे. त्यातच निसर्गाच्या नियमानुसार जनावरांच्या उत्पादन क्षमतेमध्ये फरक पडतो. उत्पादकांनी आवाक्याबाहेरील कर्ज घेतल्याने प्रसंगी तोटा होत आहे. त्यामुळे जनावरांमधील उत्पादनविषयक वैविध्य निर्माण झाल्याचे दिसून येते. तसे संकरीकरणाबाबतचे तज्ज्ञांचे धोरण व प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाज यामध्ये बरीच तफावत येत आहे.[१३]

शेतकऱ्यांच्या दुधाच्या पिळवणूकीस प्राथमिक दुग्ध संस्थेपासून सुरूवात होते. ५० मि. ली. जादा दुध मिळविण्यासाठी मापाचे तळवे चेपणे, फॅट लावण्यासाठी ३० मि. ली. पासून १०० मि.ली. पर्यंत दुध घेवून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जाते. आणि जनावरांच्या किंमतीत वाढ होत चालली आहे. जनावरांसाठी लागणाऱ्या चाऱ्याचा प्रश्नही मोठा निर्माण झाला आहे. वैरण, कडबा यांच्या न परवडणाऱ्या किंमती, गोठा, जागा भाडे, जनावरांसाठी लागणाऱ्या मनुष्यबळ व वाढती मजूरी, औषधांचा खर्च यात वाढ होत चालली आहे. यामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना जादा पैसे मोजावे लागत आहेत. एकूणच वाढत्या उत्पादन खर्चामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांपुढे समस्या निर्माण झाल्या. त्याचवेळी दुग्धोत्पादकांच्या दृष्टीने दुध धंद्यात काबाडकष्ट करूनही नफा किती? हा प्रश्न निर्माण झाला आहे. दुध धंद्यातील अर्थशास्त्रच बिघडले आहे. काहिसे उदासीन बनलेल्या दुध उत्पादकांच्या या प्रश्नास बहूविध बाजू असल्याने त्यासाठी नेमके उत्तर देणे अवघड आहे. त्यामुळे या संदर्भात सर्वकष विचार करणे आवश्यक

ठरते.[१४] त्याचप्रमाणे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना दुध व्यवसाय सुरू करताना उत्तम दुधाळ जनावरे मिळत नाही. आणि जनावरांचे लसीकरण, जंतुनाशके, औषधउपचाराचा खर्च वाढत आहे. शिवाय दुध वाहतुकीतही असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत. या सर्व प्रश्नांना दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे.

**दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न :**

भारतातील असंघटीत भूमीपूत्रांना संघटीत करण्याचा पहिला प्रयत्न 'शेतकऱ्यांचा असूड' हा ग्रंथ लिहून महात्मा जोतिबा फुले यांनी केला. त्यांचे कार्य पुढे चालवणारे नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबई येथे गिरणी कामगारांची संघटना बांधली. शोषित व पिडीत समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. ऑगस्ट १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. स्वतंत्र मजूर पक्षाचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येयधोरण जाहिर करताना शेतमजूर हा समाजातील शोषित आणि पिडीत घटक विचारात घेतला होता. शेतमजुरांना किमान वेतन निश्चित करा. ही त्यांची मागणी होती. व त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र मजूर पक्षाने आंदोलन केले.[१५] तसेच ११ सप्टेंबर १९४६ साली कॉंग्रेस अंतर्गत 'शेतकरी कामगार संघ' स्थापन करून शेतकऱ्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केला. शेतकरी परिषदा, दौरे घेवून शेतकऱ्यांना जागृत व संघटीत करण्यासाठी प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य मोबदला मिळावा म्हणजे किफायतशीर भाव मिळावा.[१६] यासाठी क्रांतिसिंह नाना पाटील यांनी शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केले.

महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या महान कार्याचा वारसा पुढे चालू ठेवत असताना महाराष्ट्रात शरद जोशी यांनी शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केले. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळविण्यासाठी आंदोलने उभारून शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे महान कार्य त्यांनी केले. शेतकरी

संघटनेची स्थापना त्यांनी केली व शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे कार्य त्यांनी केले. या पायावर दक्षिण महाराष्ट्रातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना संघटीत करणे ही काळाची गरज बनली होती. दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी शेतकऱ्यांना संघटीत करणे महत्त्वाचे होते. शेतकऱ्यांना आपल्या दुधास योग्य दर मिळविण्यासाठी संघटीत करण्याचा प्रयत्न दक्षिण महाराष्ट्रात आमदार राजू शेट्टी यांनी १६ ऑक्टोबर २००६ रोजी भोगावती, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथे पहिली 'दुध परिषद' घेवून केला. या दुध परिषदेस शेतकरी व महिलांचा प्रचंड सहभाग होता. तसेच '२३ ऑक्टोबर २००६' मध्ये एका दिवसाचे लाक्षणिक दुध बंद आंदोलन केले. १९ एप्रिल २००७ ते १ मे २००७ पर्यंत १३ दिवस संपुर्ण कोल्हापूर जिल्ह्यातून पायी 'निर्धार यात्रा' काढली. त्यामधे हजारो स्त्री-पुरूषांचा सहभाग होता. २५ मे २००७ साली दोन दिवसांचे लाक्षणिक 'दुध बंद आंदोलन' झाले. तत्कालिन मुख्यमंत्र्यांनी दिलेले एक महिण्याच्या आत दुध दरवाढीचे आश्वासन पूर्ण केले नाही, त्यांनी दिलेला शब्द पाळला नाही.[१७] या प्रश्नांवर शेतकऱ्यांना संघटीत करण्याचा प्रयत्न केला. दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुध दराबद्दल गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेश या राज्यातील दुध दर व महाराष्ट्रात असणारा दुध दर यांच्यातील २ ते ४ रूपयेची असणारी तफावत दाखवून दिली. या मुद्यांबरोबरच दुध उत्पादन खर्च व दुधास मिळणारा भाव यांच्यातील फरक दुध उत्पादकांसमोर मांडून शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केले. तसेच दुधाचा खरेदी दर १० ते १२ रूपये आहे. मात्र विक्रीचा दर २२ ते २४ रूपये आहे. हि तफावत दुग्धोत्पादकांसमोर मांडून त्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केले गेले. अशा प्रकारे दक्षिण महाराष्ट्रात शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न झालेले दिसून येतात.

**दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे दुध बंद आंदोलन :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकरी असंख्य अडी-अडचणींवर मात करून दुधाचे उत्पादन करतो आहे. पुढे या दुधास उत्पादन खर्चावर आधारित दर

मिळत नसल्याकारणाने दुग्धोत्पादक शेतकरी संघटीत होवून आंदोलन उभारतात. या दुध बंद आंदोलनाचा अभ्यास विविध टप्प्यात करण्यात आला आहे.

**<u>दुध बंद आंदोलनाचा पहिला टप्पा</u> :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या 'दुध बंद' आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणजे '१६ ऑक्टोबर २००९' रोजी भोगावती, ता. करवीर येथे घेतलेली पहिली 'दुध परिषद' होय. या दुध परिषदेत आमदार राजू शेट्टी यांनी दुधास प्रतीलिटर १८ रूपये भाव देण्याची मागणी केली. भोगावती येथे भरविलेल्या दुध परिषदेस ३० ते ४० हजार दुध उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. यावेळी दुध परिषदेत ठराव मान्य केली की, दुध उत्पादकांच्या अतिरिक्त पैशावर दुध संघ संचालकांनी भ्रष्टाचारी वृत्तीतून बेहिशोबी पैसा मिळविला आहे.[१८] त्यामुळे प्रतिलिटर १८ रूपये दर मिळाल्याशिवाय एक थेंब हि दुध, दुध संघांना न घालण्याचा निर्धार दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केला. पुढे या आंदोलनामध्ये दक्षिण महाराष्ट्रात ठिकठिकाणी दुध संकलन करणे बंद केले. प्रथम गडहिंग्लज तालूक्यातील लिंगनूर माळावरील कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध संघाचे कामकाज व दुध संकलन बंद करण्यात आले. यावेळी दुध उत्पादक संघांनी हे दुध बंद आंदोलन मागे घेण्यासाठी प्रयत्न केले. त्यामध्ये पोलीस खात्याच्या मदतीने १७ आंदोलकांना अटक केली होती. परिणामी १३ दुग्धोत्पादक आंदोलकांनी लिंगणूर माळानजीक दुध वाहतूक करणाऱ्या टेम्पोतील आठ कॅनमधील दुध रस्त्यावर ओतले. यानंतर रात्री १२.३० च्या दरम्यान भडगांव जवळ वारणा दुध संघाच्या चिंचेवाडी दुध शितकरण केंद्रातून गोव्याकडे जाणाऱ्या दोन टेम्पोतील दुध ओतून दिले. दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी यानंतर शिरोळ तालुक्यातील उदगांव येथे फेरी काढली. या दरम्यान शहरांकडे जाणारे ३०० लिटर दुध कृष्णा नदीत ओतण्यात आले. तसेच दुध संघाच्या गैरकारभाराबाबत निषेध नोंदविण्यात आला व रॅली काढली.[१९] तसेच करवीर तालुक्यातील दुध संस्थांनी दुध संकलन न करण्याचा फलक संस्थेच्या बाहेर लावून ठेवले. तर कागल तालुक्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांनी दुधापासून विविध पदार्थ

तयार केले व गावामध्ये वाटण्यात आले. तसेच गगनबावडा येथील ६४ दुध संस्थांनी दुध बंद आंदोलनात सहभाग घेतला. शाहूवाडी तालूक्यात सर्व दुध संस्था बंद ठेवल्या होत्या. दुध संकलनाचे काम पुर्णपणे ठप्प होते.[२०] १६ ऑक्टोबर २००६ च्या दुध बंद आंदोलनानंतर २४ ऑक्टोबर २००६ रोजी पुन्हा दुध बंद आंदोलन झाले. या आंदोलनात हातकणंगले तालूक्यात दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी ३५ हजार लिटर दुध संकलन थांबवले. आणि संपूर्ण हातकणंगले तालूक्यातून मोटारसायकल रॅली काढण्यात आली होती. रूकडी, माणगांव, चोकाक, अतिग्रे, मुडशिंगी या गावांत १००% दुध संकलन बंद केले.[२१] अशा प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी पहिल्या टप्प्यात 'दुध बंद आंदोलन' केले.

<u>दुध बंद आंदोलनाचा दुसरा टप्पा</u> :

१६ ऑक्टोबर व २४ ऑक्टोबर २००६ रोजी केलेल्या दुध बंद आंदोलनानंतर दुसरा टप्पा म्हणजे २५ मे २००७ पासून चार दिवस केलेले 'दुध बंद आंदोलन' होय. या आंदोलनाची घोषणा दक्षिण महाराष्ट्रात निघालेल्या 'निर्धार यात्रे'च्या समारोपावेळी कोल्हापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालय याठिकाणी झालेल्या महासभेत राजू शेट्टी यांनी केली.

'दुध बंद आंदोलनानिमित्त चर्चा करण्यास कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील दुध संघाचे प्रतिनिधी आणि स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते यांच्यात २१ मे २००७ रोजी रविवारी बैठक झाली. ही बैठक निष्फळ ठरली. या बैठकीमध्ये ठरले कि, २५ मे पर्यंत दुध दरवाढीचा प्रस्ताव द्यावा. अन्यथा २६ मे ते २९ मे २००७ या कालावधीत दुध बंद ठेवण्याचा निर्णय कायम आहे. याबरोबर प्रत्येक फॅटला तिन रूपये दराने वाढ करावी हि मागणी आहे'.[२२] २२ मे २००७ रोजी दुध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी राजू शेट्टी म्हणाले की, ऊसापेक्षा जास्त पिळवणूक दुध व्यवसायात झाली आहे. शेतकऱ्यांकडून ६ फॅटचे दुध १२ रूपयाने संकलित केले जाते. त्यावर संकलन, उकळणे, पॅकिंग, वाहतूक व वितरण या पाच प्रक्रियांतून दुधाची विक्री केली जाते.

खरेदीनंतर यासाठी ५.५० पैसे खर्च येत असून १७.५० पैशानी दुधाची विक्री झाली पाहिजे. परंतू हेच दुध २५ रूपये लिटरने विकले जात आहे. त्यामुळे दुधाचा दर वाढविण्यासाठी २६ मे २००७ पासून दुध बंद आंदोलन सुरू होईल.[२३] या निर्णयावर 'दुध बंद' आंदोलन काळात दुध संकलन व विक्री पोलीस बंदोबस्तात केली. याशिवाय दक्षिण महाराष्ट्रात आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बंदी आदेश लागू करण्यात आले. २५ मे २००७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दुध उत्पादक शेतकऱ्यांचे नेते व दुध संघाचे मालक यांची बैठक जिल्हाधिकारी यांच्या समवेत झाली. या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी यांनी असे घोषित केले की, 'पोलीस बंदोबस्तात दुधाची वाहतूक होणार'. यावर शेतकऱ्यांचे प्रतिनिधी राजू शेट्टी म्हणाले की, 'दुध उत्पादक दुधाची विक्री करणार नाही. त्यामुळे वाहतुकिचा प्रश्नच उद्भवत नाही'. त्यामुळे ही बैठक निष्फळ ठरली.[२४] दक्षिण महाराष्ट्रात दुध उत्पादक शेतकऱ्यांनी दुधाचा दर वाढवून मिळावा म्हणून २६ मे २००७ रोजी 'चार दिवसांचे दुध बंद आंदोलन' पुकारले होते. तत्पूर्वी २५ मे २००७ च्या मध्यरात्री दुध बंद आंदोलन सुरू केले. शिरोळच्या दत्त सहकारी साखर कारखान्यातून सांगलीकडे जाणारे ट्रक स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या शेतकऱ्यांनी रोखले. दरम्यान ट्रकवर दगडफेक करून काचा फोडल्या. तर वारणा दुध संघाच्या टँकरच्या चाकातील हवा सोडण्यात आली.[२५] या दुध बंद आंदोलनामुळे २६ मे २००७ रोजी बैठक घेण्याचे ठरले. यावेळी दक्षिण महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी विविध मागण्या मांडल्या त्या पूढीलप्रमाणे-

१) दुधाला प्रति फॅट २ रूपयांऐवजी ३ रूपये भाव द्या.

२) दुध उत्पादनावर आधारित दर मिळाला पाहिजे.

३) देवथाळे समिती व राधाकृष्ण विखे-पाटील समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करा.[२६]

या विविध मागण्या दुध उत्पादक शेतकऱ्यांनी मांडल्या यावर झालेल्या बैठकीमध्ये विविध निर्णय घेण्यात आले.

१) दुध दरवाढीसंदर्भात महिन्याभरात निर्णय घेणे.

२) १२ जून पूर्वी दुध संस्थांच्या प्रतिनिधींच्या बैठक होवून त्यांच्याशी चर्चा करणे.

३) दुध उत्पादन व वितरण यातील तफावतीची चौकशी आयुक्तामार्फत करणे.[२७]

वरील सर्व निर्णय बैठकीत झाले. आणि या बैठकीत तत्कालीन दुग्ध राज्यमंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, "चर्चेतून मार्ग काढू, आंदोलनाने शेतकऱ्यांचे नुकसान होईल, दुध दरवाढीचा निर्णय तडकाफडकी घेता येणार नाही. दरवाढीचा निर्णय घेण्याइतके अधिकार राज्यदुग्धमंत्र्यांना नाहीत."[२८] या वक्तव्यावर दुध उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी राजू शेट्टी म्हणाले की, 'शेतकऱ्यांची चिंता तुम्ही करू नका, आजपर्यंत शासनाने काय केले आहे, शेतकऱ्यांकडून घेण्यात येणारे दुध व त्यांच्या विक्रीची किंमत यात तफावत का? हा पैसा कुठे जातो?'[२९] या सारख्या अनेक प्रश्नांवर या बैठकीत चर्चा झाली.

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या दुध बंद आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी म्हणजे २८ मे २००७ रोजी कर्नाटकातून अभय दुध डेअरीसाठी आणण्यात आलेल्या टेम्पोवर आंदोलकांनी इचलकरंजी येथील शिरदवाड पुलाजवळ दगडफेक करून काचा फोडल्या. या टेम्पोमधील वीसहून अधिक कॅनमधील दुध रस्त्यावर ओतून दिले. तसेच कागल तालूक्यात सिद्धनेर्लीजवळ भारत दुध डेअरीचा टेम्पो अडवून त्यामधील दीड हजार लिटर दुध आंदोलकांनी गरीब कुटुंबांना वाटले. खोची ता. हातकणंगले येथे वारणा दुध संघासाठी संकलन करण्यात येणारा टँकर अडविण्यावरून दुग्ध वाहतुक करणारे कर्मचारी व दुग्धोत्पादक आंदोलक यांच्यात तंटे झाले. दरम्यान कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांत दुध बंद आंदोलन शेतकऱ्यांनी केले.[३०] दक्षिण महाराष्ट्रात विविध ठिकाणी बंद पाळण्यात आले. प्रथम 'शिरोळ तालूक्यात शंभर टक्के बंद पाळण्यात आले. शिरोळ तालूक्यात आंदोलनास उत्स्फूर्तपणे पाठींबा मिळाला. दुध संकलन कडकडीत बंद राहिले. दुध दरवाढीबाबत

वचन दिल्याप्रमाणे २६ जून पर्यंत निर्णय न झाल्यास राज्यातील सर्व दुध उत्पादक रस्त्यावर उतरतील.[३१] असे सुचविण्यात आले होते. आणि राधानगरी तालूक्यात 'शिरगांव, मुसळवाडी, कांबळवाडी, राशिवडे खुर्द, बेले, पुंगाव, सिरसे या गावांत सकाळ आणि संध्याकाळी दुध संकलन झाले नाही. त्याबरोबरच पोर्ले, नांदगाव, कोतोली येथेही प्राथमिक शाळेजवळ दुध वाहतूक करणाऱ्या दोन टेम्पोंची आंदोलकांनी मोडतोड करून कॅनमधील दुध रस्त्यावर ओतले. गडहिंग्लज, आजरा, चंदगड तालूक्यांतील गोकुळ वारणा, हिरा व महालक्ष्मी या दुध संघांच्या दुध संस्थांनी २६ जून २००७ रोजी सकाळी व संध्याकाळी दुधाचे संकलन केले नाही. चंदगड तालूक्यात तावरेवाडी व शिनोळी येथील गोकुळ, मयूर, सह्याद्री दुध संघांच्या गेट बाहेर आंदोलक ठाण मांडून बसले.[३२] तर लाटवडे, भेंडवडे, नरंदे या गावांत आठ पैकी सात दुध संस्थेने दुध संकलन केले नाही. शिरगांव-सौते मार्गावरील गोकूळच्या टेम्पोतील तीन कॅन दुध रस्त्यावर ओतले. त्यामुळे सायंकाळी बहूतांश ठिकाणी दुध संस्थांनी दुध बंद केले.[३३] आणि हातकणंगले, हेर्ले, हिंगणगाव, अतिग्रे, माले, मुडशिंगी, चोकाक, रूकडी, माणगाव, रूई, साजणी, तिळवणी, माणगाववाडी, कुंभोज, नेज, नरंदे, मजले, तारदाळ, लक्ष्मीवाडी, बिरदेववाडी, आळते, कोरोची या गावांतही दुध संकलन केले नाही. त्याचबरोबर वारणा दुध संघाचे संकलन ७०% नी घटले.[३४] या प्रकारे दक्षिण महाराष्ट्रातील दुध उत्पादक शेतकऱ्यांनी दुसऱ्या टप्प्यात आंदोलन केले. या आंदोलनामध्ये २५ मे २००७ ते २५ जून २००७ पर्यंत दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी दुधास वाढीव दर मिळण्यास एक महिन्याची मुदत दिली अन्यथा नंतर दुध बंद आंदोलन करण्याचे ठरवले. या निर्णयानंतर शासनाने एक महिन्याच्या मुदतीमध्ये विविध समस्या निर्माण झाल्याचे भासवले. १ जून २००७ रोजी 'महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ, मुंबई' यांच्या वतीने महानंद येथे दुग्ध कार्यशाळा आयोजित केली. यावेळी केली. यावेळी तत्कालिन जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणाले की, दुधासंदर्भातील आंदोलनामुळे

दुधाची दरवाढ होईल. असा समज आंदोलकांनी बाळगू नये. दुध आंदोलकांनी मुख्यमंत्र्यांच्या विधानाचा चुकिचा समज करून घेतला आहे. आणि मुख्यमंत्र्यांनी एका महिण्यात सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून दुध दरवाढीबाबत निर्णय घेवू असे सांगितले. यामुळे या चर्चेत जो तोडगा निघेल तो नक्की दुध दरवाढीचा असेल किंवा नसेल कारण राज्यात दुध दरवाढ झाली तर, परराज्यातून स्वस्तातले दुध आपल्या राज्यात येईल व केंद्राच्या कायद्याप्रमाणे आपण त्यास विरोध करू शकणार नाही. तसेच दुध उत्पादकास परवडले पाहिजे. तसेच ते ग्राहाकालाही परवडले पाहिजे. याचा विचार दरवाढ करताना करावा लागणार आहे.[३५] यावरून असे म्हणता यईल की, शेतकऱ्यांना दुध दरवाढ देण्यात शासनाने निश्चित आश्वासन दिले नाही. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी या दरम्यान सरकारने दिलेला शब्द फिरवल्यास दुध दरवाढ आंदोलन अतिशय उग्र स्वरूपात होईल असे घोषित केले. आणि दुध दरवाढी संदर्भात राज्य सरकारने आश्वासनांची पूर्ती न केल्यामुळे सांगली जिल्ह्यांत २६ जूनच्या मध्यरात्रीपासून दुध बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. असे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी घोषित केले.

**तिसरा टप्पा :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा तिसरा टप्पा म्हणजे २७ जून २००७ पासून केलेले चार दिवस दुध बंद आंदोलन होय. या दुध बंद आंदोलनात ग्रामीण भागातून मुंबईत जाणाऱ्या दुधाचा पुरवठा होवू देणार नसल्याचा निर्धार दुध बंद आंदोलकांनी केला. या दुध बंद आंदोलनात दक्षिण महाराष्ट्रातील सर्व दुध उत्पादकांबरोबर उत्तर महाराष्ट्रातील दुध उत्पादक अत्यंत आक्रमक पद्धतीने या आंदोलनात सामिल झाले. मुंबईला जाणाऱ्या दुधाच्या टँकर्सची चोहोबाजूंनी नाकाबंदी करण्यासाठी दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धउत्पादक शेतकरी नियोजनबद्ध पद्धतीने कार्य करत होते. यावेळी दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्या त्यांनी मांडल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

१) दुधास किमान प्रतिलिटर १८ रूपये दर मिळावा.

२) शासनाने दुध दरवाढीबाबत ठोस भूमिका घ्यावी.

३) दुध संघांनी दुध प्रक्रिया व वाहतुक खर्च यांची माहिती तपशिलवारपणे द्यावी.

या मागण्या दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी मांडल्या तसेच शासनाने एक महिण्यात दुध दरवाढ करण्याचे आश्वासन देवूनही त्यांची पूर्ती केली नाही. म्हणून दुध उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलनास सुरूवात केली. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे '२८ जून २००७' रोजी सातारा जिल्ह्यांत १६, सांगली जिल्ह्यात ४ आणि कोल्हापूर जिल्ह्यात २ अशा दुध वाहतूक करणाऱ्या २२ वाहणांवर दगडफेक करण्यांत आली. दक्षिण महाराष्ट्रातील अनेक गांवामध्ये बंद पाळण्यात आले. २८ जून २००७ रोजी गोकूळ दुध संघाकडे फक्त १२०० लिटर दुध संकलन झाले. वारणा दुध संघ, मोरणा दुध संघ, मयूर दुध संघ बंद होते. सांगली जिल्ह्यातील शेतकरी संघटनेने पुकारलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दक्षिण महाराष्ट्रात दुध डेअरी, सोसायटी यांनी आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशीही कार्यालये बंद ठेवली. कवठेमहांकाळ तालूक्यात आगळगांव, मानेनगर, लंगरपेठ आणि मिरज तालूक्यातील टाकळी येथे आंदोलकांनी दुध वाहतूक करणारी चार वहाने फोडली. वाळवा, पलूस, कडेगांव, तासगांव या तालूक्यात दुध संघ व डेअरी चालकांनी दुध संकलन बंद ठेवले. आणि कडेगांव तालूक्यातील सोनहिरा, संपतराव देशमुख, हुतात्मा, राजारामबापू या दुध संघांनी संकलन पूर्णपणे बंद ठेवले.[३६]

दुग्धोत्पादक आंदोलकांनी २८ जून २००७ रोजी कोल्हापूरात मुधाळतिट्टानजीक एका टँकरवर दगडफेक केली. तर आप्पाचीवाडी जवळ दुध वाहतूक करणार टँकर अडवून त्यातील सुमारे ३,५०० लिटर दुध ओतून देण्यात आले. दरम्यान सांगली जिल्ह्यात दुध आंदोलनाचा पहिल्याच दिवशी उद्रेक झाला. सांगली जिल्ह्यात वसगडे, अंकलखोप, नांद्रे, धामणी व गाताडवाडी याठिकाणी दुधाचे पाच टँकर फोडण्यात आले. आणि रात्री दोनच्या सुमारास चितळे डेअरीचे २ टँकर कार्यकर्त्यांनी फोडले.

त्यामध्ये १० हजार लिटर दुध रस्त्यावर आणि शेतात ओतले.[३७] आणि कोल्हापूर जिल्ह्यातील १७ लाख लिटर दुधाचे संकलन ठप्प केले. सर्वाधिक दुध पुरवठा करणाऱ्या करवीर तालूक्यात दुधाचे संकलन झाले नाही. कुंभी-कासारी परिसरात पेढे व बर्फी तयार करून वाटण्याचा उपक्रम राबविला. हातकणंगले तालूक्यात १००% प्रतिसाद लाभला. गोकूळ दुध संघाचे १८ हजार लिटर तर वारणा दुध संघाचे १२ हजार लिटर दुध संकलन ठप्प होते. गडहिंग्लजमध्ये सकाळचे ३२ हजार लिटर व सायंकाळचे ३१ हजार लिटर दुध संकलन ठप्प होते. तेथे मोफत दुध वापरण्यात आले. तर चंदगड मध्ये ८० हजार लिटर दुधाचे संकलन ठप्प होते.[३८] आंदोलनाच्या पुढच्या दिवशी म्हणजे '२९ जून २००७' रोजी दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी राजू शेट्टी यांच्याशी कोल्हापूरचे पालकमंत्री हर्षवर्धन पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भूजबळ, जलसंपदा मंत्री रामराजे निंबाळकर यांनी चर्चा करून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. परंतू कोणतेही लेखी आश्वासन जो पर्यंत मिळत नाही तो पर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांनी स्पष्ट केले. कारण यापूर्वी शेतकऱ्यांनी दोन दिवस 'दुध बंध आंदोलन' केले होते. त्यावेळी एक महिण्याच्या आत निर्णय होईल असे आश्वासन तत्कालिन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. परंतू आश्वासन पाळले नाही. ही आठवण यावेळी राजू शेट्टी यांनी करून दिली. दरम्यान मंत्रालयात दुध बंध आंदोलनाविषयी वेगवेगळ्या बैठका झाल्या तरी त्या अनौपचारिक झाल्या होत्या. त्यामुळे जोपर्यंत ठोस व लेखी आश्वासन मिळत नाही. तो पर्यंत आंदोलन सुरू राहील.[३९] असे त्यांनी जाहिर केले.

**दुध बंद आंदोलनातील शेतकऱ्यांचा सहभाग :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांच्या दुध बंद आंदोलनास संपूर्ण कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा प्रचंड सहभाग होता. दुध परिषदांना हजारो शेतकरी उपस्थित राहत होते. विविध सभा, रॅली यांनाही प्रचंड संख्येने शेतकऱ्यांचा सहभाग होता. तसेच दुधाची वाहतुक करणारी वाहने थांबवताना शेकडो

शेतकरी रस्त्यावर थांबत होते. दक्षिण महाराष्ट्राबरोबर दुध बंद आंदोलनात अहमदनगर, सातारा, पुणे या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांचा सहभाग लक्षणीय होता. अहमदनगर जिल्ह्यात मंगळापूर, कासारा दुमाला, खराडी, वाघापूर, रायते या गावांतून ८०,००० लिटर दुधाचे संकलन रोखले.[४०] तसेच २९ जून २००७ रोजी अहमदनगर जिल्ह्यातही राहूरी तालुक्यात वांबोरी फाट्यावर 'दुध बंद आंदोलन' उभारले होते. खडांबे व वांबोरी येथील आंदोलकांनी अहमदनगर ते मनमाड या महामार्गावर दुधाचे टँकर फोडले.[४१] शेकडो आंदोलक रस्त्यावर उतरले होते. अशा प्रकारे दक्षिण महाराष्ट्राबाहेरही दुध बंद आंदोलनात शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग दिसून आला. तसेच दक्षिण महाराष्ट्रातील या लढ्याचे नेतृत्त्व आमदार राजू शेट्टी यांनी केले. या आंदोलनाचा परिणाम शासनावर झाल्याचे दिसून येतो.

**आज पर्यंतच्या दुध बंद आंदोलनावरील शासनाची धोरणे :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना आंदोलनास काही प्रमाणात दाद मिळाली. या संदर्भात १९९८ सालानंतर दुधाची दरवाढ झालेली नाही. सन २००५ मध्ये दुधाच्या दरवाढीसंदर्भात सरकारने 'राधाकृष्ण विखे पाटील समिती' गठीत केली होती. या समितीच्या शिफारशीकडेही शासनाने दुर्लक्ष केले व दुधाची दरवाढ करीत असल्याची घोषणा केली. मात्र या दरवाढीमुळे दुध उत्पादकांना आर्थिक नफा तर झाला नाहीच, या उलट दुध उत्पादन खर्च वाढत गेला. १३ ऑगस्ट २००६ रोजी शासनाने परिपत्रक काढून दुध दरवाढ जाहीर केली. प्रतिलिटर १.२५ पैसे दरवाढ केली. परंतू या दरवाढीतील १ रूपया हा जिल्हा दुध संघ व तालूका दुध संघ यांना व प्रत्यक्ष ०.२५ पैसे दुध उत्पादकास मिळाले. १ डिसेंबर २००६ रोजी एक परिपत्रक शासनाने काढले. त्यानुसार १ रूपयानी दुध दरवाढ केली. मात्र ही दरवाढ पृष्ठ व कृष दुधाचा दर पृष्ठ काळासाठी दिला.[४२] या वरून शासनाचे धोरण समजून येते की, दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नाही.

२६ मे २००७ रोजी केलेल्या दुध बंद आंदोलनानंतर शासनाने प्रतिलिटर १ रूपयाने दरवाढ केली. २६ जुन २००७ पासून चार दिवस दुध बंद आंदोलनाच्या शेवटी महाराष्ट्राचे तत्कालिन उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील आणि दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे नेते राजू शेट्टी व शिष्टमंडळाची सांगली येथील शासकीय विश्रामगृहात सुमारे सव्वातास चर्चा झाली होती. या चर्चेनंतर आंदोलन स्थगित करण्याचे आर. आर. पाटील व राजू शेट्टी यांनी सांगितले. त्यावेळी दुध दरवाढीसंदर्भात अभ्यासगट नेमून या गटाच्या अहवालानंतर मंत्रीमंडळ निर्णय घेईल असे आश्वासन तत्कालिन उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी दिल्यानंतर चार दिवसांपासून सुरू असलेले 'दुध बंद आंदोलन' स्थगित करण्यात आल्याची घोषणा केली. आणि दुध दरवाढीसंदर्भात हा अभ्यासगट, शेतकरी संघटना, दुध उत्पादक संघ, महत्त्वाचे खरेदी-विक्री संघ व राज्य दुध संघ यांच्याशी चर्चा करून अभ्यासाअंती अहवाल तयार करेल. दोन ते तीन आठवड्यांत हा अहवाल मंत्रीमंडळाला सादर केला जाईल. आणि सर्व बाजूंनी अभ्यास करून मंत्रीमंडळ दुध दरवाढीचा निर्णय घेईल. यावेळी दुध उत्पादक व ग्राहक तसेच पशुखाद्यांच्या किंमती यांचा प्रामुख्याने विचार केला जाईल. तसेच दुध दरवाढीबाबत नेमण्यात येणाऱ्या अभ्यासगटात तज्ज्ञांचा समावेश असेल. हा अभ्यासगट दोन महत्त्वाच्या मुद्यांवर अहवाल तयार करेल. दुधाची दरवाढ आता लगेच करावी काय? आणि दुध दरवाढ लगेच केली तर किती करावी? या दृष्टीने ते अभ्यास करतील. ग्राहकांनाही जास्त पैसे द्यावे लागू नयेत. या अनुषंगानेही अभ्यास होईल. आणखी अभ्यास करून दुध दराबाबतचे शास्त्रशुद्ध धोरण ठरविण्यासाठी कायमचा अभ्यासगट असावा काय? व त्यांनीच दर निश्चित करावा का? यावर विचार केला जाईल.[४३] असे शासनाने धोरण स्पष्ट केले होते. दुध दरवाढ अभ्यासगट हा महाराष्ट्र शासन मंत्रालयाचे अध्यक्ष मा. श्री. अशोस बसाक यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला होता. अशोक बसाक समितीने शासनाकडील दुध संकलन व वापर तसेच उपलब्ध सुविधा, राज्य शासनातर्फे वेळोवेळी निर्धारित करण्यात आलेले गाय व म्हैशीच्या दुधाचे दर,

महाराष्ट्रातील दुध खरेदी दराबाबत सद्य:स्थिती तसेच गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश व मध्यप्रदेश या राज्यातील खरेदी दुध दर, दुध उत्पादन खर्च या बाबींचा अभ्यास करून १६-०७-२००७ रोजी शासनासमोर अहवाल मांडला. त्यामध्ये सुचविलेल्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१) गाय दुध उत्पादन खर्च उत्पादकाचा १०% नफा गृहीत धरून प्रतिलिटर ११.६४ पैसे एवढा आहे. यासाठी गुणप्रत ही गाई देण्यात येणारे खाद्य, व्यवस्थापन इत्यादी बाबी विचारात घेवून ३.८% फॅट, ८.५% एसएनएफ साठी आधारभूत आहे.

**तक्ता क्र. ३.१**
**बसाक समितीने सुचविलेली गाय दुध दरवाढ**

| फॅट % | एसएनएफ % | कृषकाळास दर (रू.) | पृष्ठ काळास दर (रू.) | सरासरी दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| ३.५ | ८.५ | ११.२४ | १०.२४ | १०.७४ |
| ३.६ | ८.५ | ११.५४ | १०.५४ | ११.०४ |
| ३.७ | ८.५ | ११.८४ | १०.८४ | ११.३४ |
| ३.८ | ८.५ | १२.१४ | ११.१४ | ११.६४ |
| ३.९ | ८.५ | १२.४४ | ११.४४ | ११.९४ |
| ४.० | ८.५ | १२.७४ | ११.७४ | १२.२४ |
| ४.१ | ८.५ | १३.०४ | १२.०४ | १२.५४ |
| ४.२ | ८.५ | १३.३४ | १२.३४ | १२.८४ |
| ४.३ | ८.५ | १३.५४ | १२.५४ | १३.०४ |
| ४.४ | ८.५ | १३.७४ | १२.७४ | १३.२४ |
| ४.५ | ८.५ | १३.९४ | १२.९४ | १३.४४ |

२) गाय दुधामध्ये म्हैस दुधाची भेसळ टाळण्यासाठी ३.५% फॅट, ८.५% एसएनएफ करिता किमान दर देण्यात येत आहे. तथापि उत्कृष्ठ गुणप्रतीसाठी प्रतीपॉईंट ३० पैसे ४.२% फॅट पर्यंत व तद्नंतर २० पैसे वाढ ४.५% फॅट पर्यंत समिती प्रस्तावित करीत आहे हे वरील तक्त्यावरून दिसून येत आहे.

३) म्हैस दुध उत्पादन खर्च उत्पादकाचा १०% नफा गृहीत धरून प्रतिलिटर १७.३४ पैसे एवढा आहे. यासाठी गुणप्रत ही गाई देण्यात येणारे खाद्य, व्यवस्थापन इत्यादी बाबी विचारात घेवून ६.५% फॅट, ९.०% एसएनएफ साठी आधारभूत आहे.

**तक्ता क्र. ३.२**

**बसाक समितीने सुचविलेली म्हैस दुध दरवाढ**

| फॅट % | एसएनएफ % | कृषकाळास दर (रू.) | पृष्ठ काळास दर (रू.) | सरासरी दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| ६.० | ९.० | १६.३४ | १५.३४ | १५.८४ |
| ६.१ | ९.० | १६.६४ | १५.६४ | १६.१४ |
| ६.२ | ९.० | १६.९४ | १५.९४ | १६.४४ |
| ६.३ | ९.० | १७.२४ | १६.२४ | १६.७४ |
| ६.४ | ९.० | १७.५४ | १६.५४ | १७.०४ |
| ६.५ | ९.० | १७.८४ | १६.८४ | १७.३४ |
| ६.६ | ९.० | १८.१४ | १७.१४ | १७.६४ |
| ६.७ | ९.० | १८.४४ | १७.४४ | १७.९४ |
| ६.८ | ९.० | १८.७४ | १७.७४ | १८.२४ |
| ६.९ | ९.० | १९.०४ | १८.०४ | १८.५४ |
| ७.० | ९.० | १९.३४ | १८.३४ | १८.८४ |
| ७.१ | ९.० | १९.५४ | १८.५४ | १९.०४ |
| ७.२ | ९.० | १९.७४ | १८.७४ | १९.२४ |
| ७.३ | ९.० | १९.९४ | १८.९४ | १९.४४ |
| ७.४ | ९.० | २०.१४ | १९.१४ | १९.६४ |
| ७.५ | ९.० | २०.३४ | १९.३४ | १९.८४ |

४) म्हैस दुधात भेसळ टाळण्यासाठी ६.५% फॅट, ९.०% एसएनएफ करिता रू. १७.३४ पैसे एवढा दर देण्यात येत आहे. तथापि उत्कृष्ठ गुणप्रतीसाठी प्रतीपॉईंट ३० पैसे ७.०% फॅट पर्यंत तसेच तद्नंतर २० पैसे वाढ ७.५% फॅट पर्यंत समितीने प्रस्तावित केली आहे. ते वरील तक्त्यावरून दिसून येते.

५) शासनाने दुध संकलन व वापर तसेच उपलब्ध सुविधा या यंत्रणांचा पुर्णपणे वापर होण्याच्या दृष्टीने निश्चित धोरणात्मक निर्णय घ्यावा.

६) गुजरात, आंध्रप्रदेश, तामिळनाडू आणि मध्यप्रदेश या राज्यांत महाराष्ट्राच्या दुध दराच्या तुलनेत ०.९० पैसे ते १.४० पैसे प्रतिलिटर फरक आढळतो. हा दर समान देण्याबाबत निर्णय घ्यावा.[४४]

या शिफारशी बसाक समितीने शासनासमोर मांडल्या. मात्र शासनाने या शिफारशी आहे तशा न स्विकारता त्यामध्ये थोडासा बदल केलेला दिसून येतो तो पुढीलप्रमाणे.

१) म्हैस दुधास ७.०% फॅट, ९.०% एसएनएफ साठी प्रतिलिटर रूपये १७.९० पैसे या प्रकारे बदल केला.

२) गाय दुधास ४.०% फॅट, ८.५% एसएनएफ साठी प्रतिलिटर रूपये १२.७० पैसे या प्रकारे बदल केला.[४५]

**दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचा झालेला फायदा :**

दक्षिण महाराष्ट्रातील दुध उत्पादक शेतकऱ्यांनी घामाचे दाम घेण्यासाठी केलेल्या दुध बंद आंदोलनाचा मोठ्या प्रमाणात फायदा शेतकऱ्यांना झाला आहे असे दिसून येते. कारण शासनाने नेमलेल्या बसाक समितीच्या शिफारशीवरून म्हैशीच्या दुधास २.२० पैसे आणि गाईच्या दुधास १.५० पैसे दरवाढ केली. त्यामुळे दुध उत्पादकांना ३ कोटी रूपयांचा फायदा मिळत आहे. या प्रमाणे वर्षात १३०० कोटीहून अधिक रूपयांचा फायदा दुध उत्पादकांना मिळत आहे. तत्पूर्वी शासनाने २६ मे २००७ रोजी परिपत्रक काढून १ रूपया प्रतिलिटर दुध दरवाढ केली होती. त्यामुळे दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा झाला. म्हणजे या दुध बंद आंदोलनाचा फायदा दक्षिण महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना झाला.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) डॉ. शिंदे सुहास – 'दुध व्यवसायासमोरील आव्हाने एक सिंहावलोकन', स्वाभिमानी विचार, दिपावली विशेषांक २००७, पृ. क्र. २५.

२) उपरोक्त – पृ. क्र. २७.

३) स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १५ मे २००८, अंक १२वा, पृ. क्र. १.

४) 'कोल्हापूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', कोल्हापूर जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र शासन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१, भाग-१, पृ. क्र. ३.

५) उपरोक्त – भाग-२, पृ. क्र. ६.

६) उपरोक्त – पृ. क्र. ८१.

७) कोल्हापूर जिल्हा शासकीय दुग्ध विकास कार्यालय रेकॉर्ड, २००६-०७.

८) सांगली जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सांगली जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचनालय, महाराष्ट्र शासन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१, भाग-१, पृ. क्र. ६.

९) उपरोक्त – भाग-२, पृ. क्र. ५०, ५१.

१०) उपरोक्त – भाग-१, पृ. क्र. ६.

११) उपरोक्त – भाग-२, पृ. क्र. ५७.

१२) सांगली जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास कार्यालय, शासकीय दुध योजना रेकॉर्ड, मिरज, २००६-०७.

१३) डॉ. शिंदे सुहास – 'दुध व्यवसायासमोरील आव्हाने एक सिंहावलोकन', स्वाभिमानी विचार, दिपावली विशेषांक २००७, पृ. क्र. ३१.

१४) उपरोक्त – पृ. क्र. ३१.

१५) स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १ मे २००६, पृ. क्र. ५.

१६) पाटील डी. व्ही. – 'क्रांतिसिंह नाना पाटील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा प्रश्न', (सन १९२० ते १९५२), एम.फिल. प्रबंध, १९९२, पृ. क्र. ४४.

१७) आ. शेट्टी राजू – 'दुध पिणाऱ्याला अमृत, उत्पादकाला विष', स्वाभिमानी विचार, दिपावली विशेषांक-२००७, पृ. क्र. २.

१८) स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १ नोव्हेंबर २००६, पृ. क्र. २.

१९) उपरोक्त — पृ. क्र. ५.

२०) उपरोक्त — पृ. क्र. ५.

२१) उपरोक्त — पृ. क्र. १४.

२२) दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती, २१ मे २००७, पृ. क्र. १.

२३) उपरोक्त — पृ. क्र. १, ११.

२४) दैनिक पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, २५ मे २००७, पृ. क्र. १.

२५) दैनिक लोकमत, कोल्हापूर आवृत्ती, २६ मे २००७, पृ. क्र. १.

२६) उपरोक्त — पृ. क्र. १.

२७) उपरोक्त — पृ. क्र. १.

२८) उपरोक्त — पृ. क्र. १.

२९) उपरोक्त — पृ. क्र. १.

३०) उपरोक्त — २८ मे २००७, पृ. क्र. १.

३१) उपरोक्त — पृ. क्र. २.

३२) उपरोक्त — पृ. क्र. २.

३३) उपरोक्त — पृ. क्र. २.

३४) उपरोक्त — पृ. क्र. २.

३५) दैनिक पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, १ जून २००७, पृ. क्र. १, २.

३६) स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १ जुलै २००७, पृ. क्र. ९.

३७) दैनिक पुढारी, कोल्हापूर आवृत्ती, २८ जून २००७, पृ. क्र. ९.

३८) उपरोक्त — पृ. क्र. २.

३९) स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १ जुलै २००७, पृ. क्र. १२.

४०) उपरोक्त — १५ जुलै २००७, पृ. क्र. १५.

४१) उपरोक्त — १ जुलै २००७, पृ. क्र. १२.

४२) आ. शेट्टी राजू — 'दुध पिणाऱ्याला अमृत, उत्पादकाला विष', स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १ जुलै २००७, पृ. क्र. १८.

४३) स्वाभिमानी विचार, पाक्षिक, १ जुलै २००७, पृ. क्र. १०.

४४) बसाक समिती अहवाल, १६ जुलै २००७.

४५) कोल्हापूर जिल्हा दुग्ध उत्पादक संघ कोल्हापूर, परिपत्रक.